# स्टाफ ॲकॅडमी समितीच्या वतीने बजेट २०२५ या विषयावर व्याख्यान



स्टाफ अकॅडमी मध्ये  मार्गदर्शन करताना डॉ. मनिषा पाटील सोबत डॉ.बी.एन. रावण, डॉ. यु. एन.लाड

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी मांडलेला केंद्रीय अर्थसंकल्प हा मध्यमवर्गीयना दिलासा देणारा, शेतीच्या विकासाला चालना देणारा रोजगार निर्मितीस संधी देणारा आणि कौशल्य विकासावर भर देणारा आहे त्यामुळे या अर्थसंकल्पामुळे राष्ट्रीय विकासास अधिक हातभार लागणार आहे असे प्रतिपादन अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.मनिषा पाटील यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेज,माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व स्टाफ ॲकॅडमी समिती यांच्या संयुक्त विद्यमाने बजेट २०२५ या विषयावर आयोजित केलेल्या व्याख्यान प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ.मनिषा पाटील बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील होते.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रोफेसर डॉ. बी. एन.रावण,ॲक्टिव्हिटी प्रमुख डॉ. एस. एस. कुरलीकर होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ.उमा पाटील यांनी केले आभार प्रा.स्नेहलता कांबळे यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ.यु.एन.लाड यांनी केले.

कार्यक्रमास सर्व शिक्षक,कर्मचारी उपस्थित होते.